5 APR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील 'टेकफेस्ट' स्पर्धा**

# आयुष्यातील प्रश्न डोळसपणे समजून घ्या

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी रोजच्या आयुष्यात भेडसावणारे प्रश्न डोळसपणे समजून घ्यावेत. त्यावर ठोस उपाय शोधण्याकरिता आपल्या अर्जित ज्ञानाचा वापर करावा, तरच आपल्या ज्ञानाचा समाजाला उपयोग होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या अनेक लहान समस्यांकडे संशोधनात्मक नजरेने पाहावे. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा या समस्यांवर उपाययोजना शोधण्याकरिता अधिक कल्पकतेने वापर केला पाहिजे. कार्यक्रमात तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी स्पर्धेचा हेतू विषद केला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन संशोधन विद्यार्थ्यांनी करावे. याकरिता विद्यार्थ्यांनी सदैव जिज्ञासू असले पाहिजे, असे सांगितले. टेकफेस्टचे समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)




शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी शेजारी डॉ. जय बागी, आदी उपस्थित होते.

## संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण

या स्पर्धेत अधिविभागाच्या तृतीय वर्ष, अंतिम वर्ष बी. टेक. व एम. टेकच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी केलेल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण झाले. मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, फूड टेक्नॉलॉजी व एनजी टेक्नॉलॉजी या शाखांमधील प्रकल्पांचे सादरीकरण झाले. वर्किंग मॉडेल, लाइव डेमॉन्स्ट्रेशन, पोस्टरच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे वैज्ञानिक विचार, नवकल्पकता, संशोधन पद्धती आदी मुद्यांवर परीक्षकांनी मूल्यांकन केले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 5 APR 2017

महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठात 'टेकफेस्ट' स्पर्धा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागात 'टेकफेस्ट २०१७ प्रकल्प' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचा समारोप झाला.

विद्यार्थ्यांच्या संशोधकतेला प्रोत्साहन देण्याकरिता शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात या टेकफेस्टचे तीन गटांत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विभागाच्या तृतीय वर्ष, अंतिम वर्ष बी. टेक. व एम. टेकच्या विद्यार्थ्यांनी या वर्षी केलेल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण झाले. मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेट्रॉनिकस अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, फूड टेक्नॉलॉजी व एनर्जी टेक्नॉलॉजी या शाखांमधील प्रकल्पांचे सादरीकरण झाले. वर्किंग मॉडेल, लाइव डेमॉन्स्ट्रेशन, पोस्टरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे वैज्ञानिक विचार, नवकल्पकता, संशोधन पद्धती आदी मुद्द्यांवर मूल्यांकन केले. यावेळी प्रा. डॉ. जयदीप बागी उपस्थित होते. डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले.



टेकफेस्ट स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर डॉ. जयदीप बागी, डॉ. पी. डी. पाटील.

5 APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समस्यांवरील उपायांसाठी ज्ञानाचा वापर करा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धा उत्साहात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धेच्या समारोपप्रसंगी गुणवान विद्यार्थ्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी रोजच्या आयुष्यातील प्रश्न डोळसपणे समजून घेऊन त्यावर ठोस उपाय शोधण्याकरिता आपल्या अर्जित ज्ञानाचा वापर केला पाहिजे, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित टेकफेस्ट २०१७ प्रकल्प स्पर्धेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवताली असणाऱ्या अनेक लहान समस्यांकडेही संशोधनात्मक नजरेने पाहावे. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा या समस्यांवर उपाययोजना शोधण्याकरिता अधिक कल्पकतेने वापर केला पाहिजे. मात्र, प्रकल्पांच्या माध्यमातून केलेले हे उपयोजन लादलेले नसून स्वयंप्रेरित असले पाहिजे. अशा स्वयंप्रेरित्त संशोधनाला चालना देण्याकरिता विद्यार्थ्यांनी रिसर्च ग्रुप्सची स्थापना करून विविध कल्पनांना मूर्त स्वरूप द्यावे, त्याचे डॉक्युमेंटेशन करावे तसेच या नूतन संशोधनाचे पेटंट घ्यावे, असेही त्यांनी सांगितले. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांशी समक्ष संवाद साधत ज्ञानार्जन व ज्ञानोपयोजनाचे विविध पैलू उदाहरणांसह उलगडले. एक विद्यार्थी - एक नवकल्पना या सूत्राप्रमाणे केल्यास अधिविभागाचे एक स्वतंत्र संशोधन भांडार लवकरच उभे राहील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी स्पर्धेच्या उद्देशाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन संशोधन विद्यार्थ्यांनी करावे. याकरिता विद्यार्थ्यांनी सदैव जिज्ञासू असले पाहिजे, असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांच्या संशोधकतेला प्रोत्साहन देण्याकरिता शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात या टेकफेस्टचे तीन गटांत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अधिविभागाच्या तृतीय वर्ष, अंतिम वर्ष बीटेक. व एम. टेकच्या विद्यार्थ्यांनी या वर्षी केलेल्या संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी संशोधनात रुची घेऊन आपले योगदान द्यावे, असेही बागी यांनी सांगितले. डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले.

मेकॅनिकल, सिव्हिल, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, फूड टेक्नॉलॉजी व एनर्जी टेक्नॉलॉजी या शाखांमधील प्रकल्पांचे सादरीकरण झाले. वर्किंग मॉडेल, लाइव डेमॉन्स्ट्रेशन, पोस्टरच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रकल्पांचे वैज्ञानिक विचार, नवकल्पकता, संशोधन पद्धती आदी मुद्द्यांवर परीक्षकांनी मूल्यांकन केले.

5 APR 2017 तरूण भारत जनसंपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्य युवा पुरस्कार प्राप्त श्वेता परूळेकर आणि प्रियांका पाटील यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. आर. व्ही. गुरव, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# परूळेकर, पाटील यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने राज्य युवा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या श्वेता परूळेकर आणि प्रियांका पाटील या विद्यार्थिनींचा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

राज्य युवा पुरस्कारांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकाच वेळी दोन विद्यार्थिनींची निवड होणे, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे, अशा शब्दात त्यांचा गौरव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केला. या विद्यार्थिनींनी युवा पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे. त्यांची ही कामगिरी विद्यापीठातील अन्य विद्यार्थिनींसाठीही आदर्शवत आहे, असेही, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.